# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 26/11/2022 (शनिवार) सकाळ

## दुखापत

1) पो.स्टे. खापा :– अंतर्गत 12 कि. मी. अंतरावरील मौजा टेंभुरडोह येथे दिनांक 25/11/2022 चे 14.00 वा. दरम्यान यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी नामे– गजानन रामाजी वांगूरके, वय 56 वर्ष, रा. टेंभूरडोह याने आपली मोटर सायकल ही आरापी नामे– निलेश ताराचंद गायकवाड, वय 20 वर्ष, रा. टेभूरडोह याचे घरासमोर लावली असता यातील आरोपी यांने फिर्यादीस म्हटले की, "तूझी मोटार सायकल घरासमोरून हटव" तेव्हा आरोपी याने फिर्यादी शिवीगाळ करून हातबुक्क्याने मारपीट करून लाकडी दांडयाने हातावर पाठीवर मारून जखमी केले व जिवे मारण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन खापा येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सहायक फौजदार बंन्सोड ब. नं. 463 पोलीस स्टेशन खापा मो. नं 9923410223 हे करीत आहे.

2) पो.स्टे. सावनेर :– अंतर्गत 01 कि. मी. अंतरावरील पहीलेपार सावनेर येथे दिनांक 25/11/2022 चे 01.30 वा. दरम्यान यातील नमुद घटना वेळी व ठिकाणी यातील फिर्यादी नामे– प्रेमचंद उर्फ शुभ्म दिनदयाल बेहेटवार, वय 22 वर्ष, रा. पहीलेपार, वार्ड क्र. 17 सावनेर हा मोटर सायकलने आपल्या घरी जात असता यातील आरोपी नामे– प्रतिक उर्फ लारा खोरगडे, रा. पहीलेपार सावनेर याने विनाकारण फिर्यादीस शिवीगाळ केली यावरून फिर्यादीने त्याला हटकले असता आरोपीने बाजुला चालु असलेल्या बांधकामावरून एक लोखंडी सळाख हातात घेवुन फिर्यादीच्या डोक्यावर मारून जखमी केले पुन्हा पाहून घेण्याची धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पोलीस स्टेशन सावनेर येथे आरोपीविरुध्द कलम 324, 504, 506 भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक दोनोडे पोलीस स्टेशन सावनेर मो. क्र. 9146625532 हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**